राज्यात जलयुक्त शिवार अभियान किंवा मृद व जलसंधारणाची इतर कामे शासन, खाजगी संस्था व जनतेचा सहभाग (PPP) तत्वावर करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : जशिअ-२०१७/प्र.क्र. ३६४/जल-७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : ०२ नोव्हेंबर, २०१७.

**वाचा** : ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
१) शासन निर्णय क्रमांक- जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७,दि. ५ डिसेंबर, २०१४
२) शासन परिपत्रक क्रमांक-मफुअ-२०१६/प्र.क्र.६८/जल-८, दि.४ मे,२०१६
३) शासन परिपत्रक क्रमांक गामुध-२०१७/प्र.क्र.१३४/जल-१, दिनांक ६ मे, २०१७
४) शासन परिपत्रक क्रमांक-गामुध २०१७/प्र.क्र.६२/जल-८,दि. २५ मे,२०१७
५) शासन परिपत्रक क्रमांक गामुध-२०१७/प्र.क्र.४७/जल-२०, दि ४ सप्टेंबर, २०१७

**प्रस्तावना :-**

टंचाईमुक्त महाराष्ट्र-२०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्याच्या उद्देशाने अभिसरणाच्या माध्यमातून मोठया प्रमाणात मृद व जलसंधारणाची कामे करण्यासाठी राज्यात जलयुक्त शिवार अभियान हा प्रमुख महत्वाकांक्षी कार्यक्रम सन २०१५-१६ पासून प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या योजना निधी, राज्य शासनाचा नियमित योजनाचा निधी, जिल्हा स्तरावरील योजनाचा निधी, स्थानिक विकास निधी (आमदार /खासदार निधी), मुख्यमंत्री सहायता निधी, अशासकीय संस्था, खाजगी संस्था, धर्मादाय संस्था, व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्व (CSR) निधी व लोक सहभाग तसेच विषेश निधीतून अभिसरणाच्या माध्यमातून सदर अभियान अंतर्गत कामे करण्यात येत आहेत.

खाजगी संस्था, लोक सहभाग व शासन यांच्या सहभागाने (PPP) जलसंधारणाची कामे राबविण्याबाबत वर्धा जिल्हातील यशोदा नदीच्या खोऱ्यातील प्रकल्पास शासनाने दिनांक ११ सप्टेंबर,२०१६ रोजीच्या पत्रान्वये तत्वत: मान्यता दिलेली आहे. या प्रकल्पांतर्गत टाटा ट्रस्ट यांचा सहभाग २०%, कमलनयन जमनालाल बजाज फाऊंडेशन यांचा सहभाग २०%, लोकसहभाग ५% व राज्य शासनाचा सहभाग ५५% असा आहे. तसेच खाजगी संस्था, लोक सहभाग एकत्रित (४०+५) किमान ४५ % व शासन कमाल ५५% अशा सहभागाने (PPP तत्वावर) अकोला, चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ या जिल्ह्यातील टाटा ट्रस्ट व अंबुजा सिमेंट यांच्या प्रकल्पास तत्वत: मान्यता दिलेली आहे.

२. जलयुक्त शिवार अभियाना संदर्भात विस्तृत सूचना दि. ५ डिसेंबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेला असून, उक्त शासन निर्णयातील परिच्छेद १५ नुसार सीएसआर, अशासकीय संस्था, लोकसहभागाबाबत मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील असे नमूद करण्यात आले आहे. यानुषंगाने खालील प्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत.

अ) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत व जलयुक्त शिवार अभियान व्यतिरिक्त नाला खोलीकरण व रूंदीकरण करणे, खोल सलग समतर चर करणे, शेततळी व डोह यामधील गाळ काढणे या कामांबाबत संबधित अशासकीय संस्था यांना डिझेलकरीता निधी देण्याबाबत करावयाच्या कार्यवाही बाबत सूचना शासन परिपत्रक, जलसंधारण विभाग, क्र. मफुअ-२०१६/प्र.क्र.६८/जल-८, दि. ४ मे २०१६ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

ब) राज्यातील धरणामधील गाळ काढणे व तो शेतामध्ये वापरणे यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना शासन निर्णय दि. ६ मे २०१७ नुसार राबविण्यात येत आहे.

क) गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या कार्यक्रमांतर्गत गाळ काढण्याकरीता खाजगी व्यक्ती, अशासकीय संस्था, ग्राम पंचायत यांनी यंत्रसामुग्री उपलब्ध केल्यास त्यांना द्यावयाचे इंधनाचे दर निश्चित करणेबाबत सूचना शासन परिपत्रक गामुध-२०१७/प्र.क्र.६२/जल-८, दि. २५ मे २०१७ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

ड) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नाला खोलीकरण व रूंदीकरणाच्या लोकसहभागातून होणाऱ्या कामांकरीता ग्रामपंचायत, खाजगी व्यक्ती, अशासकीय संस्था यांनी यंत्रसामुग्री उपलब्ध केल्यास त्यांना दयावयाच्या इंधनासह यंत्र च्या दराबाबत सूचना शासन परिपत्रक मृद व जलसंधारण विभाग, क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२४/जल-२० दि. ४ सप्टेंबर २०१७ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

३. वर्धा जिल्ह्यात PPP तत्वावर तत्वत: मान्यता दिलेल्या प्रकल्पाच्या अनुषंगाने राज्यात अशासकीय संस्था, खाजगी संस्था, धर्मादाय संस्था, व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्व (CSR) निधी व लोक सहभाग यांच्याद्वारे (PPP मॉडेल) मृद व जलसंधारणाची कामे हाती घेण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

राज्यात जलयुक्त शिवार अभियान हा प्रमुख महत्वाकांक्षी कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत असून, अभियानातंर्गत मोठया प्रमाणात मृद व जल कामे करण्यात येत आहेत. त्याच प्रमाणे जलयुक्त शिवार मधील गांवा व्यतिरिक्त इतर ठिकाणी देखील अशा स्वरुपाची कामे घेण्यात येत आहेत. शासकीय यंत्रणेबरोबरच अशासकीय संस्था, खाजगी संस्था, धर्मादाय संस्था, व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्व (CSR) निधी व लोक सहभाग यामधून देखील मृद व जलसंधारणाची कामे हाती घेण्यात येत आहेत.

मृद व जलसंधारणाची कामे करण्यासाठी अशासकीय संस्था/ खाजगी संस्था/ धर्मादाय संस्था/ व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्व (CSR) निधी व लोक सहभाग यांच्या सहयोगातून किमान ४५ टक्के निधी व शासन कमाल ५५ टक्के निधी अशा स्वरुपाचे वर्धा, अकोला, चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ या जिल्ह्यातील प्रकल्पास शासनाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. याच धर्तीवर राज्यात जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत मृद व जलसंधारणाची कामे करण्यासाठी पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

१. PPP तत्वावर मृद व जलसंधाराची खालीलप्रमाणे कामे करण्यात यावीत.

   अ) पाणलोट क्षेत्र विकासाची कामे

   आ) क्षेत्र उपचार: कंपार्टमेंट बंडिग, ढाळीचे बांध, सलग समतल चर, खोल सलग समतल चर, मजगी, अनघड दगडी बांध, शेततळे इ.

   इ) नाला उपचार : माती नाला बांध, अर्दन स्ट्रक्चर, गॅबियन बंधारा, नाला खोलीकरण व रुंदीकरण, सिंमेट बंधारा, गाळ काढणे इ.

   ई) सर्व उपचाराची दुरुस्ती

२. पाणलोट विकासाची कामे करताना माथा ते पायथा या संकल्पनेने करण्यात यावीत.

३. या परिपत्रका अन्वये निर्गमित करण्यात येत असलेले PPP धोरण व त्यानुसार ४५ टक्के लोकसहभाग आणि ५५ टक्के शासनसहभाग तत्व हे या शासन परिपत्रकातील परिच्छेद- २ (अ) (ब) (क) व (ड) नुसार निर्गमित केलेल्या सूचनांनुसार करण्यात येणाऱ्या कामांकरीता लागू होणार नाही.

४. खाजगी /अशासकीय संस्था यांना शासनाच्या सहभागाने (PPP) काम करावयाचे असल्यास संस्थाचा/ लोकसहभागासह किमान सहभाग ४५% व उर्वरीत कमाल ५५ % सहभाग राज्य शासनाचा असेल.

५. शासनाच्या सहभागाने (PPP तत्वावर) करावयाचे जिल्ह्यातील प्रस्ताव प्रथम संबंधित संस्थेने तयार करावेत तदनंतर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली असणा-या जलयुक्त शिवार अभियान जिल्हास्तरीय कार्यकारी समिती यांची मान्यता घेण्यात यावी.

६. या प्रकल्पांतर्गत सर्व उपचारांचे तांत्रिक व आर्थिक मापदंड शासनाने विहीत केलेल्या निकषांनुसार असावेत. तसेच जिल्हाधिकारी यांनी मान्यता देण्यापुर्वी संबंधित समुचित प्राधिकरणाकडून/तांत्रिक विभागाकडून प्रस्ताव तपासून घेण्याची कार्यवाही करावी.

७. सहभागी होणारी खाजगी संस्था/अशासकीय संस्था यांचे सोबत शासनाचे हित विचारात घेवून व शासनाच्या धोरणास बाधा पोहचणार नाही अशाप्रकारे आवश्यक तो करारनामा संबंधित जिल्हाधिकारी यांचेमार्फत तयार करण्यात यावा.

८. शासनाच्या हिश्याची रक्कम ही जलयुक्त शिवार अभियानाकरीता जिल्हाधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेल्या निधीमधून /मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अथवा इतर अनुज्ञेय योजनाच्या निधी स्त्रोतातुन उपलब्ध करुन देण्यात यावा. याबाबत निधी उपलब्धतेची खात्री करावी.

९. जिल्हाधिकारी यांनी कामावर लक्ष ठेवण्यासाठी नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

१०. कामाचे मोजमापे घेण्याची कार्यवाही करण्यासाठी संस्था, शासन व स्थानिक जनता या तिन्ही घटकांच्या प्रतिनिधींचे संयुक्त पथक गठित करण्यात यावे.

११. या संदर्भात विकसीत करण्यात आलेल्या प्रणालीवर काम सुरु होण्यापूर्वी, काम सुरु असताना व काम पूर्ण झाल्यानंतरचे GPS Photo अपलोड करण्यात यावेत.

१२. सदर कामे करण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/परिपत्रक/आदेश यामधील सूचना लागू राहतील. खोलीकरण, रुंदीकरण संदर्भात शासनाच्या प्रचलित निकषांचे /शासन निर्णयामधील सूचनांचे तंतोतत पालन करण्यात यावे.

१३.लोकसहभागाची व संस्थामार्फत उपलब्ध करून देण्यात येणारी ४५% रक्कम ज्याप्रमाणात उपलब्ध होईल त्या प्रमाणात शासनाच्या हिश्याची ५५% रक्कम उपलब्ध करून देण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी.

१४. जिल्हाधिकारी यांनी हाती घेण्यात आलेल्या प्रकल्पांच्या अनुषंगाने प्रगती अहवाल दर १५ दिवसांनी शासनास सादर करावा.

१५. सहभागी होणारी खाजगी संस्था/अशासकीय संस्था यांचे सोबत शासनाचे हित विचारात घेवून व शासनाच्या धोरणास बाधा पोहचणार नाही अशाप्रकारे आवश्यक तो करारनामा संबंधित जिल्हाधिकारी यांचेमार्फत करण्यात यावा.

१६. कामे पूर्ण झाल्यानंतर कामांची मालकी ही शासनाची राहील ही बाब स्पष्टपणे करारात नमूद करण्यात यावी.

हे शासन परिपत्रक वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनुक्रमे ३८३/२०१७/व्यय-१५, दि. २८ जुलै, २०१७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परित्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७११०२१७०७३९३६२६ असा आहे व हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Eknath Rajaram Dawale

Digitally signed by Eknath Rajaram Dawale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=499dd4df91587ffef1e20a2ee9e560dd0777e49ff6cfc838f362fdbb58c58e7b, cn=Eknath Rajaram Dawale
Date: 2017.11.02 17:53:01 +05'30'

**(एकनाथ डवले)**
सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति :**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा.विरोधी पक्षनेता,विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
४. सर्व सन्माननीय विधानसभा/विधान परिषद व संसद सदस्य,
५. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
६. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
७. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८. अपर मुख्य सचिव (कृषी),कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई
१०.अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुर्नवसन), मंत्रालय
११.आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय, पुणे
१२.आयुक्त (मृद व जलसंधारण), औरंगाबाद
१३.विभागीय आयुक्त (सर्व)
१४.संचालक (मृदसंधारण),कृषि आयुक्तालय, पुणे

१५.मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) , पुणे.

१६.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे

१७.संचालक,महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे

१८. संचालक, भूजल व सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे

१९.मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.

२०.अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.